जनता आवाज
आवाज जागरूक जनतेचा

# एमएसएमई मंत्रालयातर्फे आयडिया हॅकॅथॉन ३.0चे आयोजन; ११ जुलैपर्यंत अर्जाची अंतिम मुदत

**लोणी (जनता आवाज वृत्तसेवा)** : सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने एमएसएमई आयडिया हॅकॅथॉन ३.० ची घोषणा करण्यात आली आहे. एमएसएमई आयडिया हॅकाथॉन ३.० स्पर्धेमध्ये महिला विद्यार्थी, महिला स्टार्टअप आणि महिला एमएसएमई यांच्याकडून समस्या सोडवण्याकरिता ११ जुलै पर्यंत नाविन्यपूर्ण कल्पना मागविण्यात आल्या आहे. प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय लोणी येथे सलंग्न इंक्युबेटरच्या माध्यमातून या हॅकॅथॉनमध्ये सहभाग नोंदविता येऊ शकेल. अशी माहीती प्राचार्य डॉ.संजय गुल्हाने यांनी दिली.

या विषयी माहीती देतांना या विभागाचे प्रमुख डॉ.संजय कुरकुटे म्हणाले, सहभागी स्पर्धकांची तज्ञ निवड समितीच्या माध्यमातून निवड करण्यात येणार असून सलग्न इंक्युबेटरमध्ये प्रोटोटाईप स्टेजवरील नवउद्योजकांना इनक्युबेशन प्रोग्रामकरिता निवड आणि आर्थिक सहाय्य करण्यात येणार आहे. लघु आणि मध्यम उद्योग आणि भारतातील महिलांना नागरिकांना स्थानिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधतांना नाविन्यपूर्ण उपाय तयार करता यावेत असा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचा हा प्रयत्न आहे. एमएसएमई इनोव्हेटिव्ह हा एक समग्र दृष्टीकोन असून, तीन उपघटक आणि उपाययोजना एकत्र करून त्यात समन्वय साधणे हा उद्देश आहे. एमएसएमई इनोव्हेटिव्ह ही एमएसएमईसाठी एक नवीन संकल्पना आहे. यामध्ये इनक्युबेशन, डिझाइन इंटरव्हेन्शन आणि आयपीआरचे संरक्षण करून एमएसएमईना भारतातील नावीन्यपूर्ण उपक्रमांबद्दल जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. निवडण्यात येणाऱ्या स्टार्टअॅपना होस्ट इंस्टीट्युटच्या माध्यमातून एमएसएमई मंत्रालयातर्फे प्रत्येकी १५ लाख रुपयापर्यंत अनुदान (सीड फंड) देण्यात येईल.महिला विद्यार्थीनी, महिला नवउद्योजक आणि महिला एमएसएमईनी अधिक माहितीसाठीआणिउपक्रमातसहभागीहोण्यासाठी https://my.msme.gov.in/inc/HackathonšReg.aspx संकेतस्थळाला भेट द्यावी, आणि योजनांचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे आवाहन डॉ. संजय एल कुरकुटे , डॉ. एस बी मगर यांच्यावतीने करण्यात आले आहे.यासाठी ९८५०१३८९१७, ९८२२८१३६५२ या भ्रमणध्वनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री 09 Jul 2023 - 09 Jul 2023 - Page 2

# एमएसएमई मंत्रालयातर्फे आयडिया हॅकॅथॉन ३.० चे आयोजन

## ११ जुलै पर्यंत अर्ज करण्याची अंतिम मुदत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने एमएसएमई आयडिया हॅकॅथॉन ३.० ची घोषणा करण्यात आली आहे. एमएसएमई आयडिया हॅकाथॉन ३.० स्पर्धेमध्ये महिला विद्यार्थी, महिला स्टार्टअप आणि महिला एमएसएमई यांच्याकडून समस्या सोडवण्याकरिता ११ जुलै पर्यंत नाविन्यपूर्ण कल्पना मागविण्यात आल्या आहे. प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय लोणी येथे सलंग्न इंक्युबेटरच्या माध्यमातून या हॅकॅथॉनमध्ये सहभाग नोंदविता येऊ शकेल. अशी माहीती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

या विषयी माहीती देतांना या विभागाचे प्रमुख डॉ. संजय कुरकुटे म्हणाले, सहभागी स्पर्धकांची तज्ञ निवड समितीच्या माध्यमातून निवड करण्यात येणार असून सलग्न इंक्युबेटरमध्ये प्रोटोटाईप स्टेजवरील नवउद्योजकांना इनक्युबेशन प्रोग्रामकरिता निवड आणि आर्थिक सहाय्य करण्यात येणार आहे. लघु आणि मध्यम उद्योग आणि भारतातील महिलांना नागरिकांना स्थानिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधतांना नाविन्यपूर्ण उपाय तयार करता यावेत असा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचा हा प्रयत्न आहे.

एमएसएमई इनोव्हेटिव्ह हा एक समग्र दृष्टीकोन असून, तीन उपघटक आणि उपाययोजना एकत्र करून त्यात समन्वय साधणे हा उद्देश आहे. एमएसएमई इनोव्हेटिव्ह ही एमएसएमईसाठी एक नवीन संकल्पना आहे. यामध्ये इनक्युबेशन, डिझाइन इंटरव्हेन्शन आणि आयपीआरचे संरक्षण करून एमएसएमईना भारतातील नावीन्यपूर्ण उपक्रमांबद्दल जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे.

निवडण्यात येणाऱ्या स्टार्टअॅपना होस्ट इंस्टीट्युटच्या माध्यमातून एमएसएमई मंत्रालयातर्फे प्रत्येकी १५ लाख रुपयापर्यंत अनुदान (सीड फंड) देण्यात येईल.महिला विद्यार्थीनी, महिला नवउद्योजक आणि महिला एमएसएमईनी अधिक माहितीसाठी आणि उपक्रमात सहभागी होण्यासाठी https://my.msme.gov.in/inc/HackathonšReg.aspx संकेतस्थळाला भेट द्यावी, आणि योजनांचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे आवाहन डॉ. संजय एल कुरकुटे , डॉ. एस बी मगर यांच्यावतीने करण्यात आले आहे.यासाठी ९८५०१३८९१७, ९८२२८१३६५२ या भ्रमणध्वनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.